# श्रीमद्भागवत रामायण स्तोत्र(9.11)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

## श्रीमद्भागवतमहापुराणम्

## नवमः(स्) स्कन्धः

## अथैकादशोऽध्यायः

श्रीशुक उवाच

भगवानात्मनाऽऽत्मानं(म्), राम उत्तमकल्पकैः ।
सर्वदेवमयं(न्) देव- मीज आचार्यवान् मखैः ॥ 1॥

श्रीशुक म्हणतात - भगवान श्रीरामांनी वसिष्ठांची आपले आचार्य म्हणून नेमणूक करून उत्तम सामग्रीने संपन्न यज्ञांनी आपणच आपल्या सर्वदेवस्वरूप स्वयंप्रकाश आत्म्याचे पूजन केले ॥ 1 ॥

**होत्रेऽददाद् दिशं(म्) प्राचीं(म्), ब्रह्मणे *दक्षिणां(म्) प्रभुः ।**

***अध्वर्यवे प्रतीचीं(ञ्) च, उदीचीं(म्) सामगाय सः ॥ 2॥**

त्यांनी होत्याला पूर्व, ब्रह्मदेवाला दक्षिण, अध्वर्यूला पश्चिम आणि उद्गात्याला उत्तर दिशा दक्षिणा म्हणून दिली ॥ 2 ॥

**आचार्याय ददौ शेषां(यँ), यावती भूस्त*दन्तरा ।**

***मन्यमान इदं(ङ्) कृत्स्नं(म्), ब्राह्मणोऽर्हति निः(स्)स्पृहः ॥ 3॥**

त्यातून जेवढी भूमी शिल्लक राहिली होती, ती त्यांनी आचार्यांना दिली. त्यांना माहीत होते की, संपूर्ण भूमीचा अधिकारी केवळ निःस्पृह ब्राह्मणच आहे॥ 3 ॥

***इत्ययं(न्) तदलं(ङ्)कार- वासोभ्यामवशेषितः ।**

**तथा राज्ञ्यपि वैदेही, सौमं(ङ्)*गल्यावशेषिता ॥ 4॥**

अशा प्रकारे सगळ्या भूमंडळाचे दान करून त्यांनी आपल्या शरीरावरील वस्त्रे आणि अलंकार एवढेच आपल्याजवळ ठेवले. तसेच महाराणी सीतादेवींजवळ सुद्धा फक्त मंगल वस्त्रे आणि सौभाग्यालंकारच शिल्लक राहिले ॥ 4 ॥

**ते *तु *ब्रह्मण्यदे*वस्य, वात्सल्यं(वँ) वीक्ष्य सं(म्)स्तुतम् ।**

**प्रीताः(ख्) क्लिन्नधि*य*स्तस्मै, *प्रत्यर्प्येदं(म्) बभाषिरे ॥ 5॥**

जेव्हा आचार्यादी ब्राह्मणांनी पाहिले की, भगवान श्रीराम ब्राह्मणांनाच आपले इष्टदेव मानतात, त्यांच्या अंतःकरणात ब्राह्मणांबद्दल अत्यंत स्नेह आहे, तेव्हा त्यांचे हृदय प्रेमाने द्रवले. त्यांनी प्रसन्न होऊन सगळी पृथ्वी भगवंतांना परत दिली आणि म्हटले ।। 5 ।।

***अप्रत्तं(न्) नस्त्वया किं(न्) नु, भगवन् भुवनेश्वर ।**

**यन्नोऽन्तर्हृदयं(वँ) *विश्य, तमो हं(म्)*सि स्वरोचिषा ॥ 6॥**

प्रभो ! आपण सर्व लोकांचे एकमेव स्वामी आहात. आपण आमच्या हृदयात राहून आपल्या तेजाने आमच्या अज्ञानांधकाराचा नाश करीत आहात. अशा स्थितीत आपण आम्हांला काय दिले नाहीत बरे ? ।। 6 ।।

**नमो ब्रह्मण्यदेवाय, रामायाकुण्ठमेधसे ।**

**उत्तमश्लोकधुर्याय, न्यस्तदण्डार्पिताङ्घ्रये ॥ 7॥**

आपले ज्ञान अनंत आहे. पवित्र कीर्ती असणाऱ्या पुरुषांमध्ये आपण सर्वश्रेष्ठ आहात. जे कोणाला कोणत्याही प्रकारे दुःख देत नाहीत, अशा महात्म्यांना आपण आपले चरणकमल दिले आहेत. असे असूनही आपण ब्राह्मणांना आपले इष्ट दैवत मानता. भगवन ! अशा आपल्या या रामरूपाला आम्ही नमस्कार करीत आहोत. ॥ 7 ॥

**कदाचिल्लोकजिज्ञासुर्- गूढो रात्र्यामलक्षितः ।**

**चरन् वाचोऽशृणोद् रामो, भार्यामुद्दिश्य कस्यचित् ॥ 8॥**

परीक्षित ! एकदा आपल्या प्रजेची स्थिती जाणून घेण्यासाठी श्रीराम रात्रीच्या वेळी गुप्तपणे फिरत असता त्यांनी कोणाचे तरी बोलणे ऐकले || 8 ||

**नाहं(म्) बिभर्मि त्वां(न्) दुष्टा- मसतीं(म्) परवेश्मगाम् ।**

**स्त्रीलोभी बिभृयात् सीतां(म्), रामो नाहं(म्) भजे पुनः ॥ 9॥**

तो पत्नीला म्हणत होता. तू दुष्ट आणि कुलटा आहेस. तू दुसऱ्याच्या घरी राहून आली आहेस. स्त्रीलोभी राम खुशाल सीतेला ठेवून घेऊ देत, परंतु मी तुला पुन्हा घरात घेणार नाही ॥ 9 ॥

**इति लोकाद् बहुमुखाद्, दुराराध्यादसं(वँ)विदः ।**

**पत्या भीतेन सा त्यक्ता, प्राप्ता प्राचेतसाश्रमम् ॥ 10॥**

मूर्ख लोकांना खूष ठेवणे अवघड आहे. जेव्हा श्रीरामांनी अनेकांच्या तोंडून ही गोष्ट ऐकली, तेव्हा त्यांनी लोकापवादाला भिऊन सीतादेवींचा त्याग केला. तेव्हा त्या वाल्मीकींच्या आश्रमात राहू लागल्या॥ 10 ॥

**अन्तर्वत्न्यागते काले, यमौ सा सुषुवे सुतौ ।**

**कुशो लव इति ख्यातौ, तयोश्चक्रे क्रिया मुनिः ॥ 11॥**

त्यावेळी त्या गर्भवती होत्या. वेळ येताच त्यांनी दोन जुळ्या पुत्रांना जन्म दिला. वाल्मीकींनी त्यांचे जातकर्मादी संस्कार करून त्यांना कुश व लव अशी नावे ठेवली ॥11 ॥

**अं(ङ्)गदश्चित्रकेतुश्च, लक्ष्मणस्यात्मजौ स्मृतौ ।**

**तक्षः(फ्) पुष्कल इत्यास्तां(म्), भरतस्य महीपते ॥ 12॥**

परीक्षिता ! लक्ष्मणाला अंगद आणि चित्रकेतू असे दोन पुत्र आणि भरतालाही तक्ष आणि पुष्कल असे दोन पुत्र होते. ॥12 ॥

**सुबाहुः(श्) श्रुतसेनश्च, शत्रुघ्नस्य बभूवतुः ।**

**गन्धर्वान् कोटिशो जघ्ने, भरतो विजये दिशाम् ॥ 13॥**

तसेच शत्रुघ्नालाही दोन पुत्र झाले - सुबाहू आणि श्रुतसेन. भरताने दिग्विजय करताना कोट्यवधी गंधर्वांचा संहार केला॥ 13 ॥

**तदीयं(न्) धनमानीय, सर्वं(म्) राज्ञे न्यवेदयत् ।**

**शत्रुघ्नश्च मधोः(फ्) पुत्रं(लँ), लवणं(न्) नाम राक्षसम् ।**

**हत्वा मधुवने चक्रे, मथुरां(न्) नाम वै पुरीम् ॥ 14॥**

त्याने त्यांची सर्व संपत्ती आणून ती श्रीरामांकडे सोपविली. शत्रुघ्नाने मधुवनामध्ये मधूचा पुत्र लवण नावाच्या राक्षसाला मारून तेथे मथुरा नावाची नगरी वसविली ॥14॥

**मुनौ निक्षिप्य तनयौ, सीता भर्त्रा विवासिता ।**

**ध्यायन्ती रामचरणौ, विवरं(म्) प्रविवेश ह ॥ 15॥**

श्रीरामांनी त्याग केलेल्या सीतादेवींनी पुत्रांना वाल्मीकींच्या हाती सोपविले आणि श्रीरामांच्या चरणकमलांचे ध्यान करीत भूमिप्रवेश केला॥ 15 ॥

**तच्छ्रुत्वा भगवान् रामो, रुन्धन्नपि धिया शुचः ।**

**स्मरं(म्)स्तस्या गुणां(म्)स्तां(म्)स्तान्- नाशक्नोद् रोद्धुमीश्वरः ॥ 16॥**

ही वार्ता ऐकून श्रीरामांनी बुद्धिपुरःसर शोकावेग आवरण्याचा प्रयत्न केला, परंतु सीतेच्या गुणांची आठवण होऊन ते तो आवरू शकले नाहीत. ॥ 16 ॥

स्त्रीपुं(म्)प्रसं(ङ्)ग एतादृक्- सर्वत्र त्रासमावहः ।

अपीश्वराणां(ङ्) किमुत, ग्राम्यस्य गृहचेतसः ॥ 17॥

हा स्त्री आणि पुरुषाचा संबंध सगळीकडे असाच दुःखाला कारणीभूत आहे. श्रेष्ठ लोकांनाही तो दुःख देतो, मग गृहासक्त, विषयी पुरुषांच्यासंबंधी काय सांगावे ? ॥ 17 ॥

तत ऊर्ध्वं(म्) ब्रह्मचर्यं(न्), धारयन्नजुहोत् प्रभुः ।

त्रयोदशाब्दसाहस्र- मग्निहोत्रमखण्डितम् ॥ 18॥

यानंतर श्रीरामांनी ब्रह्मचर्य धारण करून तेरा हजार वर्षेपर्यंत अखंड अग्निहोत्र धारण केले ॥18 ॥

स्मरतां(म्) हृदि विन्यस्य, विद्धं(न्) दण्डककण्टकैः ।

स्वपादपल्लवं(म्) राम, आत्मज्योतिरगात् ततः ॥ 19॥

त्यानंतर आपले स्मरण करणाऱ्या भक्तांच्या हृदयात, दंडकारण्यातील काटे लागलेले आपले कोमल चरण ठेवून ते ज्योतिर्मय आत्मरूपात अंतर्धान पावले ॥ 19 ॥

नेदं(यँ) यशो रघुपतेः(स्) सुरयाच्ञयात्त-

लीलातनोरधिकसाम्यविमुक्तधाम्नः ।

रक्षोवधो जलधिबन्धनमस्त्रपूगैः(ख्)

किं(न्) तस्य शत्रुहनने कपयः(स्) सहायाः ॥ 20॥

परीक्षित! भगवंतांच्या सारखा प्रतापशाली दुसरा कोणीही नाही, मग त्यांच्यापेक्षा वरचढ कसा असू शकेल ? देवतांनी प्रार्थना केल्यावरून त्यांनी हा अवतार धारण केला होता. अशा स्थितीत श्रीरामांच्या बाबतीत ही काही गौरवाची गोष्ट नव्हे की, त्यांनी शस्त्रास्त्रांनी राक्षसांना मारले किंवा समुद्रावर सेतू बांधला. तसे पाहाता, शत्रूना मारण्यासाठी त्यांना वानरांचे साहाय्य घेण्याची तरी काय आवश्यकता होती ? ही सर्व त्यांची लीलाच आहे ॥ 20 ॥

यस्यामलं(न्) नृपसदस्सु यशोऽधुनापि
गायन्त्यघघ्नमृषयो दिगिभेन्द्रपट्टम् ।
तं(न्) नाकपालवसुपालकिरीटजुष्ट-
पादाम्बुजं(म्) रघुपतिं(म्) शरणं(म्) प्रपद्ये ॥ 21॥

ज्यांचे निर्मल यश सर्व पाप नाहीसे करणारे असून ते दिग्गजांचे काळे शरीरसुद्धा आज उजळ करते, मोठ-मोठे ऋषी राजांच्या सभेमध्ये ज्याचे गायन करतात, स्वर्गातील देवता आणि पृथ्वीवरील राजे आपले किरीट जेथे टेकवतात, त्या श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांना मी शरण जात आहे॥ 21 ॥

स यैः(स्) स्पृष्टोऽभिदृष्टो वा, सं(वँ)विष्टोऽनुगतोऽपि वा ।

कोसलास्ते ययुः(स्) स्थानं(यँ), यत्र गच्छन्ति योगिनः ॥ 22॥

ज्यांनी श्रीरामांचे दर्शन घेतले, त्यांना स्पर्श केला, त्यांचा सहवास घेतला आणि अनुयायित्व स्वीकारले ते सगळे अयोध्यानिवासीसुद्धा त्याच लोकी गेले, जेथे योगी योगसाधनेने जातात ॥ 22 ॥

पुरुषो रामचरितं(म्), श्रवणैरुपधारयन् ।

आनृशं(म्)स्यपरो राजन्, कर्मबन्धैर्विमुच्यते ॥ 23॥

राजा ! जो मनुष्य आपल्या कानांनी श्रीरामांचे चरित्र ऐकतो, त्याला सरळता, कोमलता आदी गुणांची प्राप्ती होते. आणि तो सर्व कर्मबंधनांपासून मुक्त होतो ॥ 23 ॥

राजोवाच

कथं(म्) स भगवान् रामो, भ्रातॄन् वा स्वयमात्मनः ।

तस्मिन् वा तेऽन्ववर्तन्त, प्रजाः(फ्) पौराश्च ईश्वरे ॥ 24॥

परीक्षिताने विचारले- भगवान श्रीराम आपल्या भावांबरोबर कसे वागत होते ? तसेच भरतादी भाऊ आणि अयोध्यानिवासी प्रजाजन भगवान श्रीरामांशी कशा रीतीने वागत ? ।। 24 ।।

श्रीशुक उवाच

अथादिशद् दिग्विजये, भ्रातॄं(म्)स्त्रिभुवनेश्वरः ।

आत्मानं(न्) दर्शयन् स्वानां(म्), पुरीमैक्षत सानुगः ॥ 25॥

श्रीशुक म्हणतात- त्रिभुवनपती महाराज श्रीरामांनी आपल्या भावांना दिग्विजय करण्याची आज्ञा केली आणि स्वतः निजजनांना दर्शन देत आपल्या अनुयायांसह ते अयोध्या नगरीची देखरेख करू लागले ॥ 25 ॥

आसिक्तमार्गां(ङ्) गन्धोदैः(ख्), करिणां(म्) मदशीकरैः ।

स्वामिनं(म्) प्राप्तमालोक्य, मत्तां(वँ) वा सुतरामिव ॥ 26॥

त्यावेळी अयोध्यापुरीतील रस्ते सुगंधित जल आणि हत्तींच्या मदरसाने भिजलेले असत. त्यावेळी असे वाटत होते की, ही नगरी आपले स्वामी आलेले पाहून आनंदाने बेभान झाली आहे । 26 ॥

प्रासादगोपुरसभा- चैत्यदेवगृहादिषु ।

विन्यस्तहेमकलशैः(फ्), पताकाभिश्च मण्डिताम् ॥ 27॥

तेथील महाल, गोपुरे, सभागृहे, विहार, देवालये इत्यादींवर सुवर्णकलश बसविले होते आणि ठिकठिकाणी पताका फडकत होत्या ॥ 27 ॥

पूगैः(स्) सवृन्तै रम्भाभिः(फ्), पट्टिकाभिः(स्) सुवाससाम् ।

आदर्शैरं(म्)शुकैः(स्) स्रग्भिः(ख्), कृतकौतुकतोरणाम् ॥ 28॥

ते नगर देठांसह सुपारीचे घोस, केळीचे खांब आणि सुंदर वस्त्रांच्या पताकांनी सजविलेले होते. आरसे, वस्त्रे आणि पुष्पमाळांनी तसेच मंगल चित्रांनी आणि पाना-फुलांच्या तोरणांनी संपूर्ण नगरी झगमगत होती ॥ 28 ॥

तमुपेयुस्तत्र तत्र, पौरा अर्हणपाणयः ।

आशिषो युयुजुर्देव, पाहीमां(म्) प्राक् त्वयोद्धृताम् ॥ 29॥

नगरवासीजन आपल्या हातात निरनिराळ्या भेटवस्तू घेऊन भगवंतांजवळ येत आणि त्यांना प्रार्थना करीत की, "महाराज ! पूर्वी आपणच वराहरूपाने पृथ्वीचा उद्धार केला होता. आता आपण तिचे पालन करावे ॥ 29 ॥

ततः(फ्) प्रजा वीक्ष्य पतिं(ञ्) चिरागतं(न्),

दिदृक्षयोत्सृष्टगृहाः(स्) स्त्रियो नराः ।

आरुह्य हर्म्याण्यरविन्दलोचन-

मतृप्तनेत्राः(ख्) कुसुमैरवाकिरन् ॥ 30॥

पुष्कळ दिवसानंतर महाराज आलेले कळले, तेव्हा सर्व स्त्री-पुरुष त्यांच्या दर्शनाच्या लालसेने घरदार सोडून गच्च्यांवर चढून अतृप्त नेत्रांनी कमलनयन भगवंतांना पाहात पाहात त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करीत ॥ 30 ॥

**अथ प्रविष्टः(स्) स्वगृहं(ञ्), जुष्टं(म्) स्वैः(फ्) पूर्वराजभिः ।**

**अनन्ताखिलकोषाढ्य- मनर्घ्योरुपरिच्छदम् ॥ 31॥**

अशा प्रकारे प्रजेला दर्शन देऊन श्रीराम पुन्हा पूर्वज राजे राहात असलेल्या आपल्या महालात येत असत. त्यामध्ये सर्व प्रकारचे इतके मोठे खजिने होते की ज्यातील संपत्ती कधीच संपत नसे. ते मोठमोठ्या बहुमूल्य अशा पुष्कळशा सामग्रींनी सुसज्ज होते ॥ 31 ॥

**विद्रुमोदुम्बरद्वारैर् -वैदूर्यस्तम्भपङ्क्तिभिः ।**

**स्थलैर्मारकतैः(स्) स्वच्छैर्- भातस्फटिकभित्तिभिः ॥ 32॥**

महालांची उंबराची दारे पोवळ्यांनी मढविलेली होती. खांब वैडूर्य मण्यांचे होते. पाचूच्या मोठमोठ्या सुंदर फरशा होत्या. तसेच स्फटिकाच्या भिंती चमचम करीत असत ॥ 32 ॥

**चित्रस्रग्भिः(फ्) पट्टिकाभिर्- वासोमणिगणां(म्)शुकैः ।**

**मुक्ताफलैश्चिदुल्लासैः(ख्), कान्तकामोपपत्तिभिः ॥ 33॥**

**धूपदीपैः(स्) सुरभिभिर्- मण्डितं(म्) पुष्पमण्डनैः ।**

**स्त्रीपुम्भिः(स्) सुरसं(ङ्)काशैर्- जुष्टं(म्) भूषणभूषणैः ॥ 34॥**

रंगी-बेरंगी माळा, पताका, वस्त्रांची आणि मण्यांची चमक, चैतन्याप्रमाणे उज्ज्वल मोती, सुंदर भोगसामग्री, सुगंधी धूप, दीप, तसेच सुगंधी फुलांचे अलंकार यांनी ते महाल अतिशय सजविलेले होते. अलंकारांना सुद्धा विभूषित करणाऱ्या देवतांप्रमाणे असणारे स्त्री-पुरुष त्यांच्या सेवेत राहात असत ॥ 33-34 ॥

**तस्मिन् स भगवान् रामः(स्), स्निग्धया प्रिययेष्टया ।**

**रेमे स्वारामधीराणा- मृषभः(स्) सीतया किल ॥ 35॥**

परीक्षित ! आत्माराम जितेंद्रिय पुरुषांत अग्रगण्य भगवान श्रीराम त्या महालात आपल्या प्राणप्रिय पत्नी श्रीसीतादेवींसह आनंदात राहात असत ॥ 35 ॥

बुभुजे च यथाकालं(ङ्), कामान् धर्ममपीडयन् ।

वर्षपूगान् बहून् नृणा- मभि*ध्याताङ्घ्रिपल्लवः ॥ 36॥

सर्व स्त्री-पुरुष ज्यांच्या चरणकमलांचे ध्यान करीत असतात, तेच भगवान श्रीराम धर्माच्या मर्यादांचे पालन करीत वेळ-काळानुसार भोगांचा उपभोग घेत पुष्कळ वर्षेपर्यंत राहिले ॥ 36 ॥

इ*ति श्री*मद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म) सं(म)हितायां(न्)

नव*मस्कन्धे श्रीरामोपाख्याने एकादशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमु*दच्यते

पू*र्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाव*शिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

